# राशिभविष्य - जून, २०१४.

दादा दामले(dadadamle@gmail.com)

===========================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल**.** महिन्याच्या पूर्वार्धातअनारोग्याचा त्रास अधिक प्रमाणात होण्याची शक्यता दिसते. उष्णताविकारांचा त्रास होणे संभवते. तिखट पदार्थ खाऊ नका. नपेक्षामुळव्याधीचा त्रास होण्याची शक्यता जाणवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक मानसिक कष्ट होणे, इजा होणे, हाती घेतलेल्या कार्यात अडचणी येणे, अशा घटना घडण्याची शक्यता दिसते. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे व अन्य कारणांनी वैवाहिक जीवनातील अपेक्षित सुखसमाधानात बाधा येऊ शकेल. जपा. आर्थिक समस्यासोडविण्यासाठी वाम मार्ग धनाचा विचारही करू नका. बुध-मंगळ अशुभ योगामुळे बुद्धी विकृत होणे संभवते. जपा. काहीही कारणाने तुम्हा भावंडाच्या सुखात बाधा येणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. नोकरी-व्यवसायात मनोनुकुल घटना घडतील. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना बढती, पगारवाढ, अधिकारपद असे काही मिळण्याची शक्यता दिसते. प्रवासाचे योग संभवतात. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रन्थरूपात प्रसिद्ध होतील. शुक्र ग्रहाच्या अनुकुल्तेने कौटूम्बिक सुखसमाधान लाभेल. पण आप्तेष्ट मंडळीकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता जाणवते. जिभेला लगाम घालून संयम व सहनशीलतेने वागाल तर खूपच सुखाचे होईल. कुमार्गी संगतीपासून दूर राहा. श्रद्धेने श्रीगजाननाची उपासना करा.

(२) वृषभ - या राशीच्या मंडळीचा स्वभाव सध्या फार लहरी झाला

असण्याची शक्यता वाटते. त्यात या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. परंतु त्यातल्यात्यात महिन्याचा पूर्वार्ध अनारोग्य सोडता खूपच अनुकुल होईलसे दिसते. रवी ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून मनस्ताप देणारा, नियोजित कार्यात अडथळे आणणारा, आप्तेष्टसंबंध बिघ्डवणारा, आरोग्य बिघडवणारा असाच सिद्ध होईल, असे वाटते. पण गुरू-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील, अर्थलाभ होईल व दिलासा मिळेल. व्यापार-व्यवसाय असणाऱ्या या राशीच्या मंडळीना अस्थिर परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. केवळ द्रव पदार्थाचे व्यापारी आणि मानसिक रोग तज्न्य यांना काळ अनुकुल होईल. तसेच ज्यांचा परधर्मीयाशी व्यावसायिक संबंध आहे अशांना काळ लाभदायक होईल. काहीही कारणाने मित्राशी वाद, भांडण होऊन मैत्रीत बाधा येणे शक्य दिसते. जपा. संतती स्थानी असलेल्या शत्रुराशीतील मंगळामुळे मुलांपैकी कोणाचे आजार, कोणाचे मनस्ताप देणारे आचरण अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. जपून राहावे. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लेखकवर्गाचे लेखन ग्रंथरूपात प्रसिद् धहोणे शक्य दिसते. प्रवासाचे योग संभवतात. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्य ा पूर्वार्धातनैराश्य आणणाऱ्या घटना घडण्याची शक्यता जाणवते. तसेच कसली तरी चिंता त्रस्त करील. त्यामुळे अस्वस्थ व्हाल. त्यामुळे महि‍िन्याच्या उत्तरार्धात शारीरिक आरोग्य बिघडण्याची शक्यता जाणवते. जपा. पण गुरू-शुक्राच्या अनुकुलतेमुळे परिस्थिती आटोक्यात राहील असे वाटते. ज्यांचे बौद्धिक कार्यक्षेत्र ्आहे अशांना संपूर्ण महिन्याचा काळ यश

दायक व लाभदायक होईल. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे कुटुंब सुख व गृहसौख्य मिळू शकेल. काहींना अर्थलाभ होणेही शक्य दिसते. त्यामुळे त्यांना मन:शांती लाभेल्से वाटते. महिन्याच्या उत्तरार्धात धनस्थानी त्याच्या उच्च राशीत गेल्यावर कुटुंबात शुभ घटना घडतील, स्वतंत्र व्यवसाय असणारांना उत्तम आर्थिक लाभ होतील व व्यावसायिक प्रगती करणे शक्य होईल. कमिशन, दलालीवर व्यवसाय असणारांना सुद्धा काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या काही मंडळीना कुसंगतीचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. जपा. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाची आचरणविषयक समस्या, कोणाचे अभ्यासाकडे दुर्लक्ष अशापैकी कारणांनी अपेक्षित संततीसुख मिळणे कठीण दिसते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. काही भाग्यवान मंडळीना परदेश प्रवासाची संधी मिळेल अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क** - या राशीच्या मंडळीनी सध्या हातचे सोडून नवीन काही करण्याचा विचारही करू नये. आहे ती नोकरी वा व्यवसायच मनापासून करण्याचा प्रयत्न करावा. कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल व लाभदायक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना मात्र महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. आरोग्यही चांगले राहील. पण महिन्याच्या उत्तरार्धात मात्र विरोधी परिस्थितीला सामोरे जावे लागेल. सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते, जपा. पण अध्यात्मात रस असणारांना मात्र उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. तसेच सामाजिक कार्याची आवड असणारानाही अशा समाजोपयोगी कार्यात यश व सुखसमाधान

लाभेल. यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, औषध विक्रेते, वैद्यकीय व्‌ यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. दिनांक १९ पासून गुरु ग्रह याच राशीत म्हणजे स्वत:च्या उच्च राशीत येत आहे. त्यामुळे लवकरच शुभ घटना घडण्यास आरंभ होईल. पण कौटुंबिक व गृहसौख्य स्थानी शनी-राहू असल्यामुळे विविध कारणांनी सुखसमाधान मिळण्याचीशक्यता दिसत नाही. जपा. पाण्यापासून धोका संभवतो. जपा. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात उष्णता विकारांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. डोळे, घसा, मान, दाढा यांपैकी कसल्या तरी दुखण्याचा असह्य त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. तसेच आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. पण या राशीच्या नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात व्यापार-व्यवसाय असणाराना थोड्या अडचणींना तोंड द्यावे लागण्याची शक्यता दिसते. काही मंडळीना नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता आहे. गुरु ग्रह दिनांक १९ पासून कर्क राशीत व्ययस्थानी जात आहे. त्यामुळे कौटुंबिक त्रास, अपेक्षाभंग होणे संभवते. जपा पण अध्यात्मात रस असणारांना व समाजकार्य करत असणारांनातो अनुकुल व प्रगतिकारक होईल. दाम्पत्यजीवनात मतभेद, ताणतणाव होणार नाहीत याची काळजी घ्या. अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. वाहनावर वेग नियंत्रित ठेवा. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे नियमित पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना निर्माण होईल. याचे कारण स्वाभाविक दोष व मंगळामुळे होणारा हटटी, हेकट स्वभाव होय. धनस्थानी असलेले शनि-राहू कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना व चिकित्सक बौद्धिक , शैक्षणिक , ्संशोधनात्म्क व्यवसाय असणारांना काळ महिन्याचा अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात मानसिक ताण, मानहानी, निराशा, विरोध आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. जीवनसाथीचे लहरी व विक्षिप्त आचरण, मतभेद, वाद, भांडणे यांमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी गैरसमज वा संशयाने भागीदारी तुटणार नाही याची काळजी घ्यावी. दिनांक १९ पासून गुरु ग्रह उच्च राशीत लाभस्थानी गेल्यावर जन्मकुंडलीतील योगानुसार विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. विवाहेच्छू ना विवाह योग येणे संभवते. विद्यार्थ्य ाना शैक्षणिक प्रगती साधता येणे शक्य होईल. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळेही काहीना भूमिलाभ, धनलाभ वा प्रतिष्ठा प्राप्त होणे शक्य दिसते. सर्व व्यवहार जपून करा. फसवणूक होणे संभवते. शनी ग्रहाच्या साडेसातीचा अखेरचा पाच महिन्याचा काळ बाकी राहिला आहे. तो मनावर संयम ठेवून व सहनशील बनून व्यतीत केलात तर नंतर हळूहळू सर्व मनासारखे होऊ लागेल. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा. हनुमानचालिसा स्तोत्ऱाचे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या केवळ शास्त्रीय व गूढ संशोधन कार्यात कार्यरत असणारांनाच महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याचा पूर्वार्ध मन भावनाशील बनणार असल्यामुळे उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगतीस अनुकुल होईल. पण रवि-बुधाच्या प्रति कूलतेमुळे

ताप, त्रास , आजार, निराशा घटनांना तोंड द्यावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. वैवाहिक सुखातही विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकूलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. मात्र स्वत:चे व जीवनसाथीचे शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राखले गेले पाहिजे. काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. आपल्या वागण्याबोलण्याने गैरसमज निर्माण होणार नाहीत याची काळजी घ्या. मोहात सापडून अर्थहानी होणार नाही याचीही काळजी घ्या. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा व दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक -** सर्व प्रकारचे आरोग्य व वैवाहिक जीवनातील सुख दृष्टीने या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. विविध कारणांनी होणाऱ्या मनस्तापामुळेच शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्य ाचीशक्यता दिसते. म्हणून शक्यतो सहनशील बनून व मनावर ताबा ठेवून आचरण केल्यास खूपच सुखाचे होईल; व शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आनंद घेणे शक्य होईल. शिवाय सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व आर्थिक नुकसान होणार नाही याची काळजी घेऊनच करावे लागतील. चिकित्सक बौद्धिक आणि शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना कष्टानेच अपेक्षित अर्थसाहाय्य मिळविण्याचा प्रयत्न करावा लागेल. अहंकारावर ताबा ठेवून नम्रतेचे आचरण केलेत तर मित्रांशी भांडणे होणे टळेल. या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. तसेच ज्यांच्या जन्मकुंडलीत

अचानक धनलाभाचे योग असतील त्यांना असा धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(९) धनु -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत भावनाशील व हळवे झाले असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे काल्पनिक चिंता त्रस्त करत असण्याची शक्यता दिसते. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत सुखसमाधान लाभतच नसावे, असे वाटते. अशा परिस्थितीत आध्यात्मिक उपासनेत मन रमवलेत तर मन शांत होईल. ज्यांना गूढ संशोधनात रस आहे त्यांना काळ प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वकिली व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. अन्य व्यावसायिक मंडळीच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता वाटते. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. नंतर कामाचा ताण सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसेच वरिष्ठाचा त्रास होणेही संभवते. शुक्र ग्रहाच्या अल्पशा अनुकुलतमुळे कौटुंबिक सुख लाभेल; पण संतती विषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात अनारोग्याचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे जपा. काही मंडळीना पोटविकाराचा त्रास होणे संभवते. नवे प्रेमसंबंध वा स्नेहसंबध जुळून येतील. प्रवासयोग येतील. दिनांक १९ पासून गुरु ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी त्याच्या कर्क या उच्च राशीत जात आहे. त्यामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहीना असा धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होणे संभावते. श्रद्धा असेल तर “ बावन्न श्लोकी गुरुचरित्र “ दररोज नियमितपणे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धअधिक अनुकुल व लाभदायक होईल. या महिन्याचे दिनांक ८ ते १० हे तीन दिवस अविस्मरणीय अनुकुल/प्रतिकुल घटना घडण्याची शक्यता दिसते. तसा अनुभव आल्यास कळवा. महिन्याच्या पूर्वार्धातआर्थिक चिंता, नोकरीत वरिष्ठांचा त्रास , अनारोग्य, संतति समस्या, कोणाशी न पटणे अशापैकी कारणांनी मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात रवि-गुरु अनुकुल झाल्यावर सर्व काही मनासारखे घडेल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक व यशदायक होईल. शासकीय, निम-शासकीय व खाजगी नोकरदार मंडळीना विविध प्रकारचे लाभ देणारा असा सिद्ध होईल. वकिली व्यवसाय, कोळसा व्यापारी, यांनाही महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल व लाभदायक होईल. विवाहेच्छूचे विवाह ठरतील. नवे प्रेम्संबंध वा स्नेह संबंध जुळून येतील. प्रवासयोग येतील. पण प्रवासात त्रास होण्याची शक्यता आहे. जपा. आरोग्य सुधारेल. शुक्राच्या अनुकुल्तेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या पूर्वार्धात मनावर ताबा ठेवून आणि सहनशील बनून आचरण केलेततर खूपच सुखाचे होईल व उत्तरार्धातील ग्रहांच्या अनुकुलतेचा खरा आनंद लुटू शकाल. श्रद्धा असेल तर नियमितपणे दररोज “ बावन्न श्लोकी गुरुचरित्रा “चे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन अतिशय हळवे झाले असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे थोडेही काहीमनाविरुद्ध घडले तरी लगेच नैराश्य येत असावे, असे वाटते. पण त्याच बरोबर डोक्यात विचारांचे काहूर उठले असेल; असेही वाटते. नको त्या विचारांचे दडपण अस्वस्थ करीत असेल. त्यामुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असण्याची शक्यता वाटते. अशा अवस्थेत आध्यात्मिक उपासनेचा

अवलंब कराल व जिभेला लगाम घालून वागाल तर मनस्थिती शांत होईल. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने या राशीच्या मंडळीना विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री -ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना प्रगती व यश या दृष्टीने काळ अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल. पूर्वार्धात रवि-राहू-मंगळ प्रतिकुल असल्याने अनारोग्य, कौटुंबिक त्रास , मुलांपैकी कोणाचे आजार, प्र ियजनांचे दूरत्व अशापैकी कारणांनी अस्वस्थ व्हाल. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रहाच्या अनुकुल्तेने परिस्थिती सुधारेल. आरोग्यही सुधारेल आणि नोकरी-व्यवसायातही सुखसमाधान लाभेल. अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीचा स्वभाव सध्या अति चंचल, लहरी व अस्थिर झाला असण्याची शक्यता दिसते. त्यात आर्थिक चिंता, मानसिक व्यग्रता , नैराश्य यांमुळे मानसिक स्वास्थ्य लाभात नसावे. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुख लाभेल. महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रहाच्या अनुकुलतेने शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना विविध प्रकारचे लाभ होतील. वरिष्ठ अधिकारी प्रशंसा करतील. आरोग्य उत्तम राहील. सर्व सुख लाभेल. पण तोच रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल होत असल्यामुळे अनारोग्य, कौटुंबिक भांडणे, नियोजित कार्यात अडथळे येणे अशा घटना घाण्याची शक्यता दिसते. जपा. असे असले तरी गुरु ग्रह दिनांक १९ पासून त्याच्या कर्क या उच्च राशीत या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर सर्व काही सुखाचेच होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांची शिक्षणात उच्च प्रगती होईल. अर्थलाभ होईल. संततिसुख लाभेल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र

असणारांना काळ प्रगतिकारक , सफलतादायक व लाभदायक होईल. कन्या या शत्रुराशीतील मंगळ ग्रहामुळे वैवाहिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. श्रद्धा असेल तर “ बावन्न श्लोकी गुरुचरित्रा “चे दररोज नियमितपणे पठण करा.

=====ooo0ooo=====